**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम जनतेचा व**
**स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्र.ग्रापापु-१०९८/प्र.क्र.२०८/पापु.०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक :- १४ डिसेंबर, १९९८**

वाचा :- १) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.ग्रापापु १०९७/सीआर ४४८/३९-अ, दिनांक १५ सप्टेंबर, १९९४
२) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.ग्रापापु १०९७/सीआर ४४८/३९-अ, दिनांक १६ सप्टेंबर, १९९४
३) शासन पत्र, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु १०९८/१९९८/प्र.क्र.२२१/पापु-०७, दिनांक ९ डिसेंबर, १९९८

**परिपत्रक -**

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या कार्यक्रम अंमलबजावणीमध्ये जनता व स्थानिक स्वराज्य संस्थांचा सक्रिय सहभाग असावा म्हणून संदर्भीय क्रमांक २ व ३ येथील आदेशासोबत विहित करण्यात आलेल्या प्रपत्र १ प्रमाणे, स्वतंत्र योजनेच्या बाबतीत संबंधित ग्रामपंचायतीकडून योजना स्विकृतीचा ठराव करुन घेतला जातो. परंतू प्रादेशिक योजनांच्या बाबतीत असा ठराव जिल्हा परिषदांकडून घेणे तांत्रिकदृष्टया शक्य नसल्याने त्यासंबंधात खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

२. प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना हाती घेण्यापुर्वी योजनेतील सर्व समाविष्ट ग्रामपंचायतीची बैठक जिल्हा परिषदेने आयोजित करावी. या बैठकीमध्ये योजनेची पूर्ण माहिती ही संदर्भ क्र.२ व ३ येथील आदेशित सूचनांप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने करुन दयावी व तद्नंतर सदरच्या प्रादेशिक योजनेत समाविष्ट होणा-या सर्व ग्रामपंचायतींना योजना मान्य असल्याचा ठराव त्या सर्व ग्रामपंचायती व जिल्हा परिषदेने मंजूर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

**(सु. ल. तिडके)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
१) सर्व विभागीय आयुक्त
२) सर्व जिल्हाधिकारी
३) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई

४) सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
५) सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, म.जी.प्रा.
६) कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
७) संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा
८) सर्व उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा
९) सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा
१०) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व नियंत्रक अधिकारी व कार्यासन अधिकारी
११) निवडनस्ती (पापु ०७)